MHKO110008442012

**नियमित दिवाणी दावा क्र. ३३३/२०१२ मधील निशाणी क्रमांक १५१ खाली आदेश**

**नाना शिवा कांबळे वगैरे**
**वि.**
**हिराबाई रंगराव कांबळे वगैरे**

वादीने प्रस्तुतचा अर्ज हा महत्वाची कागदपत्रे दाखल करण्यासाठी सादर केलेला आहे. सदर अर्जावर प्रतिवादीने त्यांचे म्हणणे दाखल करून तीव्र विरोध दर्शविला आहे.

२. वादीचे असे कथन आहे की, सदर प्रकरण अंतिम युक्तीवादाकरीता प्रलंबित आहे. प्रकरण अंतिम युक्तीवादाकरीता नेमल्यानंतर सत्य परिस्थिती समोर येण्यासाठी वादी तर्फे महत्वाच्या कगदपत्रांची यादी सादर केली आहे. सदर कागदपत्रे दाखल केल्याने प्रतिवादीचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नाही. उलट दावेबाबत सत्य परिस्थिती न्यायालयासमोर येणार आहे. सबब, सदर अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

३. प्रतिवादी यांनी सदर अर्जावर तीव्र विरोध करुन न्यायाच्या दृष्टीने आवश्यक ते आदेश करण्याची विनंती केली.

४. वादी व प्रतिवादी तर्फे युक्तीवाद ऐकला. अभिलेखाची पाहणी केली. वादीने सदर दावा हा कायम मनाई करीता दाखल केलेला आहे. सदर दावा हा अंतिम युक्तीवादाकरीता प्रलंबित असताना वादीने दावा क्र.११३/२०१३ मधील प्राथमिक हुकूमनाम्याची व न्यायनिर्णयाची साक्षांकीत प्रत दाखल केली आहे. सदरचे न्यायनिर्णय हे सार्वजनिक दस्तऐवज आहेत. सदरची कागदपत्रे दाखल करून घेतल्यास व त्यांना निशाणी दिल्यास प्रतिवादीस कोणतेही नुकसान होणास नाही. अंतिम निर्णय देण्याकरीता सदर कागदपत्रे उपयोगी पडतील. त्यामुळे, सदर अर्ज नामंजूर करणे संयुक्तीक वाटत नाही. सबब, मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

आ दे श

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. सदर कामी कागदपत्रे दाखल करुन निशाणी देण्यास परवानगी देण्यात येते.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

स्वाक्षरी/-
( आर. एस. मोरे )
३रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
पेठवडगाव

दिनांकः- ०८/०१/२०२६.
पेठवडगाव